# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**गणेशखिंड रोड, गणेशखिंड, पुणे, महाराष्ट्र–४११००७**

## ‘कुलगुरू’ पदासाठी अर्ज

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची स्थापना १९४९ मध्ये झाली असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये हे विद्यापीठ विधिस्थापित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या परिक्षेत्रात पुणे, नाशिक आणि अहमदनगर या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो.

या विद्यापीठाच्या कुलगुरू पदाकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ११ नुसार कुलगुरू पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभवाची पूर्तता करणाऱ्या प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. संस्थांनासुद्धा योग्य उमेदवारांची नामनिर्देशने पाठविता येतील.

‘कुलगुरू’ पदासाठीची विहित शैक्षणिक अर्हता व अनुभवाची पूर्तता करणाऱ्या आणि या प्रतिष्ठेच्या व आव्हानात्मक जबाबदारीचे काम करण्यास इच्छुक व्यक्ती अर्ज करू शकतात. विहित शैक्षणिक अर्हता, अनुभव, अर्जाचा नमुना आणि इतर आवश्यक कागदपत्रांचा तपशील दर्शविणारी सविस्तर जाहिरात **www.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख ३०/०३/२०२३ असून, त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

दिनांक : २८/०२/२०२३

**अध्यक्ष**
**शोध व निवड समिती**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
## महाराष्ट्र
## ‘कुलगुरू’ पदासाठी अर्ज

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) स्थापना दिनांक १० फेब्रुवारी, १९४९ रोजी पुणे विद्यापीठ कायदा, १९४८ अंतर्गत झाली असून सध्या हे विद्यापीठ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये विधिस्थापित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या परिक्षेत्रात पुणे, नाशिक आणि अहमदनगर या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. विद्यापीठास विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ कलम २ (एफ) आणि १२ (बी) अंतर्गत मान्यताप्राप्त असून विद्यापीठाशी संलग्नित एकूण ७७६ महाविद्यालये आहेत. त्यात २७ महिला महाविद्यालये, ५२७ पदव्युत्तर केंद्रे, ३० स्वायत्त महाविद्यालये, १७६ मान्यताप्राप्त संस्था, ७९ संशोधन संस्था आणि २० इतर संस्थांचा समावेश असून विद्यापीठ परिसरामध्ये ४५ शैक्षणिक विभाग आणि १६ विद्यापीठ संस्था आहेत. विद्यापीठात ७ लाखांहून अधिक विद्यार्थी अध्ययन-संशोधन करीत आहेत.

महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपाल हे विद्यापीठाचे मा. कुलपती असून त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ''कुलगुरू'' पदासाठी नावे प्रस्तावित करण्यासाठी “शोध व निवड समिती” घटित केली आहे. ही समिती महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६च्या कलम ११ (३)(एफ) नुसार कुलगुरू पदासाठी आवश्यक असलेली पात्रता आणि अनुभव पूर्ण करणाऱ्या प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ व्यक्तींकडून अर्ज आणि संस्थांकडून योग्य व्यक्तींची नामांकने मागवत आहे. कुलगुरू पदासाठी विहित पात्रता आणि अनुभव यासंबंधीचे सर्व आवश्यक ते तपशील, अर्जाचे स्वरूप आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६च्या कलम ११ चा उतारा URL https://vcapp.unipune.ac.in वर तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या **www.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

‘कुलगुरू’ पदासाठीची विहित शैक्षणिक अर्हता व अनुभवाची पूर्तता करणारे आणि या प्रतिष्ठेच्या व आव्हानात्मक जबाबदारीचे काम करण्यास इच्छुक व्यक्ती अर्ज करू शकतात. विहित शैक्षणिक अर्हता, अनुभव, अर्जाचा नमुना आणि इतर आवश्यक कागदपत्रांचा तपशील असणारी सविस्तर जाहिरात www.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अत्यावश्यक पात्रता आणि अनुभवाची पूर्तता करणारे आणि जबाबदारी स्वीकारण्यास इच्छुक उमेदवार अर्ज करताना अर्जासोबत URL वर उपलब्ध (१) तपशिलांचा सारांश (परिशिष्ट-१), (२) ना-हरकत प्रमाणपत्र (परिशिष्ट-२), आणि (३) चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (परिशिष्ट-३) नमुन्यातील कागदपत्रांसह अर्ज करू शकतील. आवश्यक व कालक्रमानुसार जोडलेल्या दस्तऐवजांसह तसेच सुव्यवस्थित व सर्व तपशील भरलेला, पंधरा (१५) पानांपेक्षा जास्त नसलेला आपला विहित अर्ज (doc आणि pdf स्वरूपात) उमेदवारांनी ‘Google Drive’ वर सादर करणे अनिवार्य असून त्याचा दुवा (nodalofficersppu@gmail.com) या ई-पत्त्यावर नोडल अधिकाऱ्यास सादर करावा. तसेच उमेदवारांकडून त्याची एक मुद्रित प्रत डाक किंवा कुरिअरने एका बंद लिफाफ्यावर ''कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या पदासाठी अर्ज'' असे ठळक आणि सुवाच्च अक्षरात लिहून

खाली निर्देशित नोडल अधिकाऱ्याच्या पत्त्यावर दिनांक ३०/०३/२०२३ किंवा त्यापूर्वी पोहोच करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| Name | : | **Shri. C. P. Singh**<br>Former Joint Registrar |
| Address | : | Room No. FB-203,<br>IIT Kanpur,<br>Kanpur-208016<br>E-mail: nodalofficersppu@gmail.com<br>Tel. No. : 0512-6792101/8090019996 |

संस्थासुध्दा योग्य उमेदवारांचे नामनिर्देशन करू शकतील. तथापि, अशा सर्व उमेदवारांची वैयक्तिक व शैक्षणिक माहिती ३०/०३/२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी नोडल अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात पाठवणे आवश्यक आहे.

या पदाची जाहिरात दिनांक १२/११/२०२२ रोजी प्रसारित करण्यात आली होती. ज्यांनी १२/११/२०२२ च्या जाहिरातीस अनुसरून अर्ज केला आहे, अशा उमेदवारांनीदेखील या पदासाठी सदर जाहिरातीस अनुसरून पुन्हा अर्ज करणे आवश्यक राहील.

उमेदवारांचे अर्ज छाननी केल्यानंतर विद्यापीठाच्या 'कुलगुरू' पदासाठी पात्र आणि योग्य असणाऱ्या अशाच उमेदवारांना शोध व निवड समितीशी सुसंवाद साधण्यासाठी आमंत्रित केले जाईल. अर्ज छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. प्रसिध्द केलेल्या यादीतील पात्र उमेदवारांनी या पदाबाबतची आपली योग्यता तसेच या विद्यापीठासंबंधीची भविष्यवेधी भूमिका दर्शविणारे प्रत्येकी दोन पृष्ठांचे लेखन आणि तीन शिफारसी संदर्भपत्रांसह सादर करणे आवश्यक आहे. पात्र उमेदवारांनी शोध व निवड समितीशी सुसंवाद साधताना त्यांनी संपादन केलेले यश आणि विद्यापीठाबद्दलचा त्यांचा भविष्यवेधी दृष्टिकोन स्पष्ट करणारे संक्षिप्त सादरीकरण करणे आवश्यक आहे.

विहित तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज शोध व निवड समितीकडून विचारात घेतले जाणार नाहीत.

शोध व निवड समितीचे अध्यक्ष किंवा सदस्य यांना संपर्क साधण्याचा किंवा त्यांच्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांना या प्रक्रियेतून बाद केले जाईल.

**अध्यक्ष**

**दिनांक : २८/०२/२०२३** **शोध व निवड समिती**